# मुंबई विद्यापीठ

क्र.वि.क./ २८३ /२०१०

अत्यंत महत्वाचे
हस्ते बटवडा

परिपत्रकः

सर्व प्राचार्य/संचालक, संलग्नीत अशासकीय अनुदानीत व विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, व्यवस्थापन व तत्सम महाविद्यालये (अल्पसंख्यांक व बिगरअल्पसंख्याक) तसेच विद्यापीठ विभागप्रमुख यांना कळविण्यात येते की, विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचे दिनांक ५ ऑगस्ट, २०१० च्या पत्रानुसार कार्यवाही करावी.

दिनांक : ७, सप्टेंबर २०१०
स्थळ : मुंबई

स्थानापन्न कुलसचिव/कुलसचिव

---

विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
मुंबई शहर यांचे कार्यालय
प्रशासकीय इमारत चौथा माळा भाग १, आर.सी.मार्ग
चेंबूर, मुंबई - ४०० ०७१.
E-mail Add Mumbaicity sdswo@yahoo.com

जा.क्र.विजिसकअं/मुंश/भासशि/फ्रिशीप/१०-११/१०२९ दिनांक ५ ऑगस्ट, २०१०

प्रति,
मा. कुलसचिव,
मुंबई विद्यापीठ,
मुंबई.

विषय :- मागासवर्गीयांकडून शिक्षण फी व परिक्षा फी घेणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते, काही महाविद्यालयात कॅप मार्फत प्रवेश घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क घेतले जाते. मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क घेऊ नयेत असे शासनाचे आदेश आहेत. तरीही काही महाविद्यालयाकडून कॅपव्दारे प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क घेतले जाते.

आपणास विनंती करण्यात येते की, कॅपव्दारे प्रवेश घेतलेल्या खुल्या प्रवर्गात प्रवेशित झालेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क घेऊ नये अन्यथा शासन निर्णय क्र.ई.बीसी-२००३/प्र.क्र.३०१/मावक-२, दिनांक १ नोव्हेंबर, २००३ अन्वये संबधिता विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करणे भाग पडेल, तरी शासन निर्णया विरुध्द निर्णय घेऊ नये व सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना विना शुल्क प्रवेश देण्यात यावा अशा आपल्या स्तरावरुन परिपत्रकाव्दारे संबंधित महाविद्यालयांना सुचना / आदेश देण्यात यावेत, हि विनंती.

आपला विश्वासू,

सही/-
विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
मुंबई शहर